# प्र क र ण पी टो

## निष्कर्ष

# प्रकरण चौथे

## निष्कर्ष

संघ तत्त्वज्ञानातील राष्ट्र, राष्ट्रवाद व राष्ट्रबांधणी यावर मागील प्रकरणात विरोधकांनी मांडलेली मते व एकूणच संघाच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करता मला काही बाबी प्रकर्षाने जाणवल्या त्यामध्ये संघाच्या तत्त्वज्ञानाच्या काही मुद्द्यांवर आक्षेप आहेत व संघ तत्त्वज्ञान आक्षेप घेऊनही जे काही राहते त्यामध्येही काही धोरणासारखे व सद्य स्थितीला ते कामी उपयोगी पडतो का ? हे ही पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे.

संघाने एक देश, एक संस्कृती व एक लोक यामुळे निर्माण होणारी त्याबद्दलची निष्ठेची व प्रेमाची भावना यातून राष्ट्राची सिद्धता होते असे म्हटले आहे. भारत एक प्राचीन काळापासूनच राष्ट्र म्हणून विद्यमान आहे अशी संघाची धारणा आहे, प्राचीन काळापासूनच संघाच्या दृष्टीने जो या मातृभूमीवर आपली निष्ठा, प्रेम आहे असे म्हणतो तो राष्ट्रवादी लोक. व तोच हिंदु म्हणजे भारतीय लोक. येथे संघाने त्यासाठी दुसरी कोणतीही त्यासाठी अट घातलेली आढळत नाही. जशी सावरकरांच्या हिंदु शब्दाच्या व्याख्येत भारत ही ज्याची पुण्यभू व पितृभू असणारी व्यक्तीच मानली जाते. तशी अट संघाने घातलेली नसून अधिक उदारमतवादी दृष्टीने जो मातृभूमीवर आपली निष्ठा अर्पण करतो तो राष्ट्रवादी आहे असे म्हटले आहे.

राष्ट्रबांधणीसाठी विविध क्षेत्रात संबंधित संघटनांची उभारणी करुन व संघटनांच्या मूळ पायाला काही तात्त्विक अधिष्ठान देऊन त्या क्षेत्रांची पुनर्रचना करण्याचे सुद्धा निश्चित केले आहे. त्यामुळे आजही या संघटनांची व्याप्ती वाढत आहे. संघाची राष्ट्रबांधणीची संकल्पना पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या 'एकात्ममानववादाच्या तात्त्विक अधिष्ठानाशी संबंधित आहे. या एकात्ममानवदर्शनात माणसांचा तुकड्या तुकड्यांनी विचार न करता समग्र विचार करण्यात आला आहे. त्यामध्ये मानवाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सर्व क्षेत्रांचा विचार झाला आहे. मानवी जीवनाचा उद्देश फक्त एकाच क्षेत्रातील किंवा सुख मिळविण्याची जी विविध क्षेत्रे आहेत तेवढ्या पुरता मर्यादित नसून त्याची वाटचाल व्यक्ती, समष्टी व परमेष्टीकडे कशी होईल याचे विवेचन केले आहे. साधारणपणे संघाच्या या राष्ट्र, राष्ट्रवाद व राष्ट्रबांधणी बद्दलचे विचार पाहिल्यावर मला त्यामध्ये काही बाबतीत आक्षेप घेण्यासारखे मुद्देही आढळले. प्रा.स.ह.देशपांडे यांच्या 'सावरकर ते भाजप-हिंदुत्वविचारांचा चिकित्सक आलेख' या पुस्तकातील काही सूचनांना माझी सहमती आहे.

संघाच्या जबाबदार पदाधिकाऱ्यांनी संघाचा हिंदुराष्ट्रवाद ह्या देशावर प्रेम करणाऱ्या व देशातील सांस्कृतिक प्रवाहांशी एकरूप झालेल्या सर्व मुस्लिम, ख्रिस्ती, पारसी, अशा विविध उपासना पंथाच्या लोकांना राष्ट्रीय ठरवित असला तरी

संघ परिवारातील वेगवेगळ्या संघटनांनी निदान काही वेळा तरी हिंदू शब्दाचा संकुचित अर्थ लावल्याचे आढळते. रामजन्मभूमी आंदोलनाबाबत विश्व हिंदू परिषदेने आयोजित केलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमातून साध्वी ऋतंभरा व भाजपच्या खासदार उमा भारती यांनी मुस्लिम द्वेषाच्या भावनेवरच फुंकर घातली; हिंदू शब्दाची संघाला अभिप्रेत असणारी व्यापक व्याख्या त्यांच्या किती कार्यकर्त्यांपर्यंत जशीच्या तशी पोहोचलेली आहे? आणि त्यानुसार त्यांचा व्यवहारही होतो आहे? हा एका वेगळ्या संशोधनाचा विषय होऊ शकतो.

मुळात देशातील समाजाला हिंदू हे नामाभिधानही परकीयांनी दिले अशा स्थितीत जेथे हिंदू शब्दाची संकुचित व्याख्याच जनसामान्यांच्या मनात रुजलेली आहे तेथे या शब्दाचा पराकोटीचा आग्रह धरलाच पाहिजे का? ह्या प्रश्नाचा संघाने फेरविचार करण्याची गरज आहे संघाच्या प्रचारकांपैकी भाजपचे केंद्रीय सरचिटणीस असलेले गोविंदाचार्य त्यांच्या विविध मुलाखतींमध्ये "हिंदू म्हणजे भारतीय" हेच त्यांना अभिप्रेत असल्याचे सांगत असतात. कदाचित संघात ह्याबाबतीत मंथन सुरूही असेल पण संघाच्या पाठीराख्यांमधील बहुसंख्य हे हिंदूधर्मीय संप्रदायांशी संबंधित असल्यामुळे हिंदू शब्दाचा त्याग करायला त्यांची मानसिक तयारी झाली नसेल. हिंदू शब्दाच्या व्याख्येबाबत कार्यकर्त्यांच्या

आकलनाबाबत जशी अस्पष्टता आहे तशीच सामाजिक समते विषयीच्या संघाच्या भूमिकेबाबतही असावी. १९८४ नंतर डॉ.आंबेडकरांचा समावेश संघासाठी प्रात:स्मरणीय असलेल्या व्यक्तींच्या नामावळीत झाला असला तरी आंबेडकरांच्या नावाचा स्वीकार केवळ बदलत्या संदर्भात बदलत्या रणनीतीचा भाग नाही त्या बदलाची खात्री संघाच्या विरोधकांना वाटत नसणे स्वाभाविकच आहे. पण तो विश्वास संघाशी संबंधित विविध संघटनांतील कार्यकर्त्यांनाही वाटत नसावा.

खासदार उमा भारतींनी त्या उच्चवर्णीय नसल्यामुळे मिळणा-या प्रतिकूल वागणुकीबाबत प्रकट केलेल्या नाराजीवरुन हे जाणवते. 'संघाने हिंदुधर्मातील अनिष्ठ रूढी व परंपरांचे पालन करणा-या कार्यकर्त्यांबाबत कधीच टोकाची भूमिका घेतली नाही,' "त्यांना संघातून काढून न टाकता बाकीच्या कार्यकर्त्यांच्या व्यवहाराने त्यांचे मन पालटण्याचा प्रयत्न केला" अशा अर्थाची संघाच्या कार्यपद्धतीबद्दलची वर्णने अनेक ठिकाणी आढळतात. अशा रीतीने माणसे न तोडल्यामुळे संघ वाढत राहिला ही वस्तुस्थितीच आहे पण अशा प्रतिगामी वर्तनाला संघाने स्पष्टपणे प्रखर विरोध न केल्यामुळे त्या व्यवहाराला संघाची मूक मान्यताच आहे असा ब-याच कार्यकर्त्यात समज निर्माण झाला असण्याची शक्यता आहे. कोणतीही संघटना आपल्या वाटचालीच्या ओघामध्ये अधिक प्रगल्भ व अधिक उत्क्रांत होतच असते. आपल्या लक्षात न आलेल्या चार

गोष्टी किंवा पूर्वीच्या चार चुका आपण दुरुस्त करतो आहोत अशी कबुली एखाद्या संघटनेने देण्यामध्ये त्या संघटनेला कमीपणा वाटण्याचे कारण नाही. हिंदुत्वाची व्याख्या, सामाजिक समरसता ह्याबाबत संघ, पुष्कळ बदलतो आहे असे प्रा. स. ह. देशपांडे यांच्यासारख्या अभ्यासकाचे निरीक्षण असले तरी संघाचे पदाधिकारी मात्र "संघ बदलला नाही तर संघाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलला आहे" असेच सांगत असतात. आपल्या पूर्वीच्या काही भूमिका चुकीच्या होत्या हे कबूल करण्याचा मोकळेपणा संघ व संबंधित संघटनांमध्ये असल्याचे पुरावे तरी आढळत नाहीत. संघविचारांच्या विविध संघटना अनेक प्रश्नांवर परस्पर विरोधी भूमिका घेत असल्याचे एन्रॉन प्रकरणात भाजप व स्वदेशी जागरण मंच यांच्या उदाहरणावरून स्पष्ट झाले. रामजन्मभूमी विषयाबाबत जेव्हा आक्रमक भूमिका घेण्याचा हट्ट विश्व हिंदु परिषदेने धरला तो हट्ट भाजपलाही अमान्य असल्याचे अटलबिहारी वाजपेयींच्या जाहीर भूमिकेमुळे स्पष्ट झाले. संघाने राष्ट्रपुनर्निर्माणासाठी वेगवेगळ्या क्षेत्रात सुरू केलेल्या संघटना पुरेशा स्वायत्त आहेत असे एक प्रतिपादन येथे शक्य असले तरी त्यांच्यात तात्त्विक पातळीवर संघर्ष उद्भवणारच असे ठामपणे म्हणण्याजोगी परिस्थिती नाही. संघाची एकूणच भूमिका सर्वांचे अंतिम हित एकच आहे,

कोणाच्याही हितामध्ये संघर्ष नाही अशा प्रकारची असली तरी स्थूल आणि सूक्ष्म सर्वच पातळ्यांवर वेगवेगळ्या घटकांचे हितसंबंध, निदान नजीकच्या टप्प्यासाठी तरी परस्परविरोधी असतात हे अनुभावास येत असते. उदा. पाणी टंचाईच्या काळात सर्वांनाच पुरेल असे पाणी उपलब्ध नसताना अग्रक्रमाने उद्योगाला पाणीपुरवठा करायचा की शेतीला ? नगदी पिकांना करायचा की अन्नधान्यांना, स्वदेशी उद्योजकांची पाठराखण करायची असली तरी थम्स अप बनविणाऱ्या "पार्ले"ला पाठिंबा द्यायचा की कोकमचे सरबत बनविणाऱ्या छोट्या ग्रामस्थाला, अशा अनेक बाबतीत उद्भवू शकणारा संघर्ष सर्वांचेच हित सांभाळत सोडविणे केवळ तत्वज्ञानाच्या पातळीवर शक्य असेल. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र तत्वज्ञानाशी अनेक तडजोडी करत मार्ग काढावा लागेल. हे एन्रॉन-सारख्या प्रकरणातून सिद्ध झाले आहे.

ह्या सर्व उणीवा असल्या तरी प्रचलित संदर्भात विशेषत: भारतासारख्या अर्धविकसित राष्ट्रांसाठी राष्ट्रवादी भावनेचे महत्व नजरे आड करता येणार नाही जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विकसित राष्ट्रे अधिकाधिक समृद्ध आणि अर्धविकसित राष्ट्रे अधिकाधिक गरीब होण्याचा धोका आहे.

जागतिक मुक्त बाजारपेठेचा आग्रह धरणारी अमेरिका स्वत: पुरेशी मुक्त नाही. सामान्य अमेरिकन स्वदेशी उत्पादनापेक्षा जपानी उत्पादनांवर विश्वास ठेवू लागला आहे. अमेरिकेत एकामागून एक बलाढ्य उद्योग जपान्यांच्या हातात जात आहेत. त्यामुळे खडबडून जागे होऊन अमेरिकन उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी कायदेशीर उपाय योजना केली जात आहे. जपान व इतर निर्यातदारांच्या स्पर्धेला उत्तर देण्यासाठी व स्थानिक उत्पादकांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने आयातीवर अनेक निर्बंध लादलेले आहेत. स्वदेशीची चळवळ तेथेही सुरू आहे ह्या संदर्भात श्री.दत्तोपंत ठेंगडींनी मर्यादित साधनांचा जास्तीत जास्त वापर, निसर्गाचा तोल न ढळता विकास, शस्त्र स्पर्धेत संरक्षण खर्च कमी करून विकासकार्याकडे निधी वळविणे, तांत्रिक माहितीची मुक्त देवाण - घेवाण, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी टोळ्यांचा बंदोबस्त, माणसाच्या अमर्याद लोभाला आळा, जागतिक शांतता, समन्वय आणि उन्नती ह्या सर्व गोष्टी साधण्यासाठी जनजागृती हिंदुजीवन दृष्टीतूल शक्य आहे असे मांडले आहे. ठेंगडींचा हा दावा ही विचारात घेण्याजोगा आहे.

"राष्ट्रवादाला परंपरेतून स्फूर्ती घ्यावी लागते, पण परंपरा राखणे व त्याबरोबर प्रगतीकडे वाटचाल करणे ही फार अवघड कसरत असते.

परंपरा आणि आधुनिकता यांचा योग्य मेळ घालायचा तर पारंपारिक संस्कृतीतले सर्वच घटक गौरवार्ह ठरविता येत नाहीत. त्यात निवड करावी लागते. व आधुनिकतेला पोषक असे घटक राष्ट्रवादाचा आधार म्हणून स्वीकारावे लागतात. हा विवेक केला नाही आणि सगळ्या जुन्याचा जुने म्हणून गौरव करण्याचा उपक्रम केला तर राष्ट्रवाद प्रतिगामी ठरते., हिंदुराष्ट्रवादाचे असेच झाले आहे. "

संघाने आपला राष्ट्रवाद आंकताना आपले वापरलेली प्रतीके प्रामुख्याने हिंदु संप्रदायांशी संबंधित आहेत ही उणीव दूर करण्यासाठी भारतीय संस्कृतीला ज्या इतर सांस्कृतिक प्रवाहांचे योगदान लाभले त्या परंपरांशी संबंधित प्रतिके जाणीवपूर्वक व्यवहारात आणण्याची गरज राहील. स.ह.देशपांडे, यांनी त्यासंदर्भात केलेल्या सुचना खूपच मौलिक वाटल्यामुळे त्यांचा येथे उल्लेख करत आहे. राष्ट्रवादाची भावना जिवंत व सकस राखण्यासाठी तिची मुळे संस्कृतीत घट्ट रुजलेली असली पाहिजेत हे योग्यच आहे. पण त्या सांस्कृतिक संचितात हिंदु नसणा-यांनाही आपली ओळख सापडेल अशा रीतीने त्या संस्कृतीची अभिव्यक्ती झाली पाहिजे. जास्तीत जास्त सर्वसमावेशक अशी प्रतिके जाणीवपूर्वक निवडून रुढ केली पाहिजेत. हिंदु जीवन मुल्ये ही सर्व मानवांनी आत्मसात करावी अशी असतील तर त्यांचा उद्घोष हिंदु जीवन मुल्ये असा न करता मानवी जीवन मुल्ये म्हणून केल्यास ती अधिक स्वीकारार्ह ठरतील.

संपूर्ण भारतीय समाजाची श्रद्धास्थाने ठरतील. अशा थोर व्यक्तींची नामावली तयार केली जावी. ह्या नामावलीत विविध उपासना पंथ, विविध भाषा, विविध जाती जमातीतील थोर व्यक्ती समाविष्ठ केल्या गेल्या आहेत हे पाहावे लागेल. ज्या सांस्कृतिक प्रवाहाशी व्यक्ती एकरूप झाली तरी ती राष्ट्रीय ठरू शकेल असे आपल्याला वाटते, त्या सांस्कृतिक प्रवाहाचे जास्तीत जास्त स्पष्ट वर्णन होणे आवश्यक आहे. आमच्या सांस्कृतिक संचिताच्या कोणत्या गोष्टी आम्ही स्विकारतो आहोत व कोणत्या नाकारतो आहोत ह्याबाबतची भूमिका निसंदिग्ध असली पाहिजे. राष्ट्रवाद हा भावनिक विषय असला तरी त्याला थोडे कायदेशीर रूप देणे ही गरजेचे आहे. व्यक्ती सज्ञान झाल्याबद्दल पुढे ही भारताचा नागरिक राहण्यासाठी व्यक्तीने ह्या राष्ट्राशी एकनिष्ठ राहाण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. अशी प्रतिज्ञा घेण्यास तयार नसणाऱ्या व्यक्तींना नागरी स्वातंत्र्य व हक्क उपभोगता आले तरी राजकीय हक्क मात्र बजाविता येणार नाहीत. नागरिकांना अशा प्रकारचा औपचारिक दर्जा प्राप्त झाल्याशिवाय घुसखोरांचे प्रश्न व विघटनवादी चळवळींचा प्रश्न सोडविणे सोपे नसेल. देशातील राष्ट्रजीवनात सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून निर्माण होणारे लाभ सर्वांमध्ये वितरित होताना विशिष्ट जाती, विशिष्ट धर्म, विशिष्ट वंश, प्रदेश ह्यांना त्यात समान वाटा मिळणे अत्यावश्यक ठरेल. ह्या सर्व गोष्टी अंतर्भूत असणारे राष्ट्रवादाचे प्रतिमानच प्रचलित संदर्भात आवश्यक आहे. संघाला आपली राष्ट्रवादासंबंधीची मांडणी कालसंगत व अधिकाधिक लोकांना स्वीकारार्ह वाटेल अशा रीतीने करण्यासाठी ह्या दृष्टीने आत्मपरीक्षणाची गरज आहे.

ह्या प्रबंधाकेच्या बाबतीत अध्ययन सुरु असताना, माझ्या अभ्यासाला ब-याच मर्यादा पडल्या व त्यामध्ये सैध्दांतिक संकल्पना ज्यावेळी मी अभ्यासत होतो त्यावेळी त्या संकल्पना स्पष्ट होण्याच्या व कळण्याच्या दृष्टीकोनातून विचार केला असता, भाषेची विशेषतः इंग्रजी भाषा आकालनाच्या मर्यादा पडल्या आहेत. कारण ह्या संकल्पना मूळ जागतिक शब्दकोशातून आकलन होऊन स्पष्ट होणेसाठी खूप परिश्रम करावे लागले. त्यामुळे भाषेच्या आकलनातील अडचणीचीही मर्यादाही या प्रबंधाकेवर पडली आहे.

त्याचप्रमाणे येथे उपलब्ध असणा-या ग्रंथालयात मराठी पुस्तकांची कमतरता खूप होती त्यामुळेही विषयाचे सखोल ज्ञान मिळण्यास मर्यादा पडली . तसेच दुसऱ्या एखादया ठिकाणाहून ग्रंथ आणून वा तेथे जाऊन प्रबंधिकेसाठी आवश्यक असणारे साहित्य, आर्थिक बाजू भक्कम नसल्यामुळेच मिळविणे अशक्य झाले म्हणूनही काही उणीवा राहिल्या. तसेच ही शोध प्रबंधिका विद्यापीठाने ठरवून दिलेल्या वेळेतच पूर्ण करावयाची असल्यामुळे वेळेची मर्यादाही यामध्ये विशेष निर्णायक ठरली. म्हणूनच या सर्व मर्यादांमुळे ह्या शोध प्रबंधाकेचे लेखन करण्यात माझ्याकडून काही उणीवा राहिल्या आहेत याचीही मला पूर्ण जाणीव आहे. यातूनच काही अनुभव घेऊन पुढील संशोधनात या उणीवा कमी करण्याचा मी जास्तीत जास्त प्रयत्न करेन.

# संदर्भ सूची

[अ] मराठी पुस्तके :-


१] इंदूरकर गंगाधर : "राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : काल, आज आणि उद्या," श्री. विद्या प्रकाशन, पुणे, १५ मे १९८३.

२] पं. उपाध्याय दीनदयाळ : "एकात्म मानववाद", रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी प्रकाशन, मुंबई. [प्रकाशन वर्ष नाही.]

३] डॉ. वरखे रावसाहेब : "झोत", जनबोध प्रकाशन, चिंचवडगाव, पुणे, १५ ऑगस्ट १९८२.

४] केळकर भा.कृ. : "पं. दीनदयाळ उपाध्याय : विचारदर्शन", [खंड १] भारतीय विचार साधना, प्रकाशन, नागपूर, ८ मार्च १९८६.

५] डॉ. गोडबोले अरविंद : "सावरकर विचारदर्शन", पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, मे १९८३.

६] जोग ब.ना. : "हिंदु - मुसलमान ऐक्य : भ्रम आणि सत्य", उन्नति प्रकाशन, [मुलुंड पूर्व] मुंबई, मार्च १९९०.

७] जोग ब.ना. : "पं. दीनदयाळ उपाध्याय : विचारदर्शन", [खंड २] भारतीय विचार साधना प्रकाशन, नागपूर, ८ मार्च १९८६.

८] तपस्वी गो.ग. : "युग प्रवर्तक संघ", अभ्युदय प्रकाशन, डोंबिवली पश्चिम, ३ ऑक्टोबर १९९५.

९] दाते बळवंत [प्रकाशक] : "राष्ट्रचिंतन" [पं.दीनदयाळजी उपाध्याय यांच्या लेखांचा मराठी अनुवाद], भारतीय विचार साधना प्रकाशन, नागपूर, [प्रकाशन वर्ष नाही.]

१०] प्रा.देशपांडे स.ह. : "संघातले दिवस आणि इतर लेख", सुपर्ण प्रकाशन, पुणे, १० जुलै १९८३.

११] प्रा. देशपांडे स.ह. : "सावरकर ते भाजप - हिंदुत्वविचारांचा चिकित्सक आलेख", राजहंस प्रकाशन, पुणे, २८ मे १९९२.

१२] नेने वि.ना. : "पं.दीनदयाळ उपाध्याय : विचारदर्शन" [खंड १], भारतीय विचार साधना प्रकाशन, नागपूर, ८ मार्च १९८६.

१३] पतंगे रमेश : "समाजचिंतन", भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर १९९५.

१४] प्रा.पंडित नलिनी : "महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास", मॉडर्न बुक डेपो प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती, १९७२.

१५] भिशीकर चं.प. : "केशव : संघनिर्माता", भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे, [प्रकाशन वर्ष नाही.]

१६] प्रा.गोरे शेषराव : "सावरकरांचा बुद्धिवाद : एक चिकित्सक अभ्यास", निर्मल प्रकाशन, नाशिक, २८ मे १९८८.

१७] प्रा.गोरे शेषराव : "सावरकरांचे समाजकारण : सत्य आणि विपर्यास" राजहंस प्रकाशन, पुणे, २८ मे १९९२.

१८] व्होरा राजेंद्र / पळशीकर सुहास [संपा] : "राज्यशास्त्र शब्दकोश" प्रकाशक : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९८७.

१९] वैद्य मा.गो. : "हिंदुत्व : जुने संदर्भ, नवे अनुबंध" भारतीय विचार साधना प्रकाशन, नागपूर, १९७८.

२०] वैद्य मा.गो. : "राष्ट्र, राज्य आणि शासन" भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे, ७ एप्रिल १९९४.

२१] शुक्ल भानुप्रताप [संपा] : "मा.स.गोळवलकर "गुरुजी" : "राष्ट्र", भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर १९९२.

२२] सावळापूरकर पा.कृ. [संपा] : "दैशिकशास्त्र" [मराठी अनुवाद] भारतीय विचार साधना प्रकाशन, मुंबई १४ जानेवारी १९८३.

[ब] <u>हिंदी पुस्तके</u> :-

१] अग्निहोत्री रामशंकर आणि शुक्ल भानुप्रताप : "राष्ट्रजीवन की दिशाए", लोकहित प्रकाशन, लखनौ, २५ सप्टेंबर १९७९.

२] डॉ.गाबा ओमप्रकाश [संपा] : "राजनीति विज्ञान कोश", बी.आर.पब्लिशिंग कार्पोरेशन, न्यू दिल्ली.[प्रकाशन वर्ष नाही]

क] <u>इंग्रजी पुस्तके</u> :-

1) Anderson K.Walter & Damale Shridhar : 'The Brotherhood in Saffron', The R.S.S. And Hindu Revivalism, Vistar Publications, New Delhi, 1987.

2) 'India's Saffron Surge : Renaissance OR Fascism?' (A collection of Political Writings) Published By Bharatiya Janwadi Aghadi, Andheri East, Bombay, (First Edition) 1993.

3) K.Jayaprasad : R.S.S. And Hindu Nationalism', Deep & Deep Publications, New Delhi, 1991.

4) Kothari Rajani : 'Politics In India' Orient Longman Ltd, New Delhi, Reprint 1989.

5) Kothari Rajani : 'Rethinking Development ; In Search of Humane Alternatives', Ajanta Publications, New Delhi, Second Edition 1990.

6) Limaye Madhu : 'Religiious Bigotry : A Threat To Ordered State', Ajanata Publications, New Delhi, 1994.

7) Minogue K.R. : 'Nationalism', Methuen & Co.Ltd, London, First published in 1967 by BT Batsford Ltd.

8) Mishra Dinanath : 'R.S.S. Myth & Reality', Vikas Publishing House Pvt.Ltd, Sahidabad (U.P.)1980.

9) Mookarji Radha Kumud : 'Fundamental Unity of India', (General Editors Munshi K.M,N. Chandrasekhar Aiyer)Bharatiya Vidya Bhavan ,Bombay.(Publication year is not given.)

10) Narayan Jaya Prakash : 'Nation Building In India', Brahmanand (Ed.), Navachetna Prakashan Varanasi,(Publication year is not given.)

11) Dr.Prasad Rajendra : 'The Unity of India', Ministry of Information & Broadcasting Govt.of India, 1961, Reprint July 1963.

12) Raje Sudhakar (Ed.) : 'Destination,' Deendayal Upadhyaya Research Institute, New Delhi,1978.

13) Sills David L (Ed.) : 'International Ency clopedia of The Social Sciences( (Volume 11) The Macmillan Company And The Free Press, U.S.A. 1968.

14) Smith Anthony D : 'Theories of Nationalism',Gerald Duekworth & Co.Ltd.,London,1971.

15) Snyder Louis L. (Ed.) : 'The Dynamics of Nationalism : Readings In Its Meaning And Development', D.Van Nostrand Co. Inc.(USA) Prince ton, N.J.1964.

16) Tagore Rabindranath : 'Nationalism', The Macmillan Co. of India Limited,Madras,1976.

17) Verma Ramesh K. : 'Regionalism And Sub-Regionalism In State Politics', Deep & Deep Publications, New Delhi,1994.

[ड] नियतकालिके :-


१] "समाज प्रबोधन पत्रिका", त्रैमासिक, जुलै-सप्टेंबर १९९१.

२] "समाज प्रबोधन पत्रिका", त्रैमासिक, जानेवारी - मार्च १९९२.

३] "समाज प्रबोधन पत्रिका", त्रैमासिक, जानेवारी - मार्च १९९३.

४] "समाज प्रबोधन पत्रिका", त्रैमासिक, एप्रिल -मे - जून १९९४.

५] "परिवर्तन" सामाजिक परिवर्तन विशेषांक.
प्रकाशक : डॉ.हेडगेवार जन्मशताब्दी समारोह समिती,ठाणे जिल्हा, डोंबिवली पूर्व, [प्रकाशन वर्ष नाही.]

६] "विचारयात्रा" विशेषांक
प्रकाशन : श्रीमती रमाबाई आौटी विकास प्रतिष्ठाण पुणे, तर्फे प्रकाशित विशेषांक, [प्रकाशन वर्ष नाही.]

७] "साम्ययोग" १६ ऑक्टोबर १९९२.

८] "सोशिआोलॉजिकल बुलेटिन" मार्च १९९४, न्यु दिल्ली.

९] "वार्षिक स्त्री उवाच १९९३"

१०] "सुगावा" जानेवारी १९९२.

११] देशपांडे स.ह. "हू इज अॅन इंडियन नॅशनल" [अप्रकाशित लेख]

१२] डॉ.टिकेकर अरुण, "या जाहिरनाम्याचा सांस्कृतिक राष्ट्रवादाशी संबंध काय ? दै.लोकसत्ता, पुणे आवृत्ती, २१ एप्रिल १९९६.